आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२० नोव्हेंबर २०२४ - बुधवार

ठळक बातम्या

- राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी दुपारी १ वाजेपर्यंत ३२ टक्क्यांहून अधिक मतदान, गडचिरोलीत सर्वाधिक तर मुंबई शहर, जळगाव आणि नांदेडमध्ये कमी मतदानाची नोंद

- मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी राज्यात विविध लक्षवेधी मतदान केंद्र, मतदारांसाठी विविध सोयी सुविधा उपलब्ध

- मतदानादरम्यान काही ठिकाणी गैरप्रकारांचे आरोप, आचारसंहिता लागू झाल्यापासून आतापर्यंत ७०४ कोटींची मालमत्ता जप्त

- ५५वा इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आजपासून गोव्यात

<><><><>

विधानसभा निवडणुकीत राज्यात दुपारी १ वाजेपर्यंत ३२ पूर्णांक १८ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली. सर्वाधिक सुमारे ५१ टक्के मतदान गडचिरोली जिल्ह्यात झालं. सर्वात कमी म्हणजे २८ टक्क्यांच्या आसपास मतदान मुंबई शहर, जळगाव आणि नांदेडमध्ये झालंय.

मतदारसंघांचा विचार करता सर्वाधिक ५२ पूर्णांक ८४ दशांश टक्के गडचिरोली जिल्ह्यात अहेरीत आणि आरमोरीत ५१ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झालंय. सर्वात कमी मतदान जळगाव जिल्ह्यात पाचोऱ्यात १८ टक्क्यांपेक्षा कमी झालं. मुंबईत सायन कोळीवाडा आणि ठाण्यात उल्हासनगरमध्ये २१ टक्क्यांपेक्षा कमी मतदानाची नोंद झाली.

अकोला, जळगाव, मुंबई शहर, मुंबई उपनगर, नांदेड, पुणे, सोलापूर, ठाणे, वाशीम या जिल्ह्यात २८ ते ३१ टक्के;
अहमदनगर, अमरावती, औरंगाबाद, बीड, बुलढाणा, धुळे, लातूर, नागपूर, नाशिक, उस्मानाबाद, पालघर, परभणी, रायगड, सांगली, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यात ३२ ते ३५ टक्के ;
भंडारा, चंद्रपूर, हिंगोली, जालना, कोल्हापूर, नंदुरबार, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात ३६ ते ३९ टक्के आणि गोंदिया जिल्ह्यात ४० टक्के मतदान झालंय.

<><><><>

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत ६३ टक्क्यांपेक्षा जास्त आणि गेल्या विधानसभा निवडणुकीत राज्यात ६१ पूर्णांक १ दशांश टक्के मतदानाची नोंद झाली होती. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ६१ पूर्णांक ३३ शतांश

टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. मतदानाचा हक्क बजावण्यात महिलांपेक्षा पुरुष आघाडीवर असल्याचा सर्वसाधारण कल आहे. त्यामुळं मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी विविध प्रयत्न सुरू आहेत, सोयी सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी मतदारांना केलेलं आवाहन आता ऐकूया.....

<><><><>

राज्यात विविध ठिकाणी लक्षवेधक मतदान केंद्र तयार करण्यात आली आहेत. त्यात महिला विशेष, युवक विशेष, दिव्यांग विशेष, हरित अशा विविध प्रकारची मतदान केंद्र आहेत. काही मतदान केंद्रांवर आकर्षक सजावट करण्यात आली आहे. सर्व मतदान केंद्रांवर मूलभूत सुविधांसह दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

शंभरी पार केलेले मतदार, तसंच दिव्यांग मतदारांनीही प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदानाला प्रोत्साहन दिल्याचं दिसत आहे. गडचिरोलीत १११ वर्षांच्या फुलमती बिनोद सरकार यांनी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदान केलं. १०३ वर्षं वयाचे स्वातंत्र्यसैनिक जी. जी. पारिख यांनी मुंबईतल्या मलबार हिल मतदारसंघात मतदान केलं. मुंबईत कुर्ला इथं कर्करोगग्रस्त ज्येष्ठ महिला मतदाराने प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदान केलं. श्रीलंकेत राहणाऱ्या मीनल रेणावीकर यांनी श्रीलंकेतून येऊन सकाळी मतदानाचा हक्क बजावला.

राज्यातली पहिल्या क्रमांकाची मतदार रविता पंकज तडवी हिनं नंदुरबार जिल्ह्यातल्या प्रथम क्रमांकाच्या मणिबेलीतल्या केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. पालघरच्या मल्याण मतदान केंद्रावरच्या देखाव्यातून पर्यावरणाचा संदेश देण्यात आला आहे. वडाळा मतदारसंघात बृहन्मुंबई महानगरपालिकेनं हरित मतदान केंद्रावर मतदानासाठी आलेल्या पहिल्या पाच मतदारांचं रोप आणि फूल देऊन स्वागत झालं. गडचिरोली, हिंगोली जिल्ह्यातली महिला संचालित सखी मतदान केंद्रं, धुळे जिल्ह्यातलं आदर्श मतदान केंद्र, भंडाऱ्यातल्या बेला आणि रत्नागिरीच्या खेडशी इथली दिव्यांग मतदान केंद्रं, उत्तर नागपूरच्या पाचपावली इथं तृतीयपंथीयांसाठी उभारलेलं इंद्रधनुष्याच्या रंगांचं मतदान केंद्र आकर्षणाचं केंद्र ठरत आहे.

पालघरच्या जव्हार इथं आदिवासी संस्कृतीवर आधारित, तर अंधेरीतल्या वेसावे इथं कोळीवाड्याच्या संकल्पनेवर आधारित मतदान केंद्र उभारण्यात आलं आहे. नेरूळच्या तेरणा वैद्यकीय महाविद्यालयात नवी मुंबईतच्या आगरी कोळी संस्कृतीचा देखावा तयार केला आहे. बीड जिल्ह्यातल्या परळी इथं महिलांना मतदानाला प्रोत्साहित करण्यासाठी तात्पुरत्या पाळणाघरांची व्यवस्था करण्यात आली आहे.

<><><><>

विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाल्यापासून राज्यभरातून ७०४ कोटी ७१ लाख रुपयांची मालमत्ता जप्त झाली. यात २८४ कोटी रुपये किमतीचे मौल्यवान धातू, १६० कोटी रुपये रोख, १११ कोटींचा इतर मुद्देमाल, ७५ कोटी रुपये किमतीचं मद्यं आणि ७३ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ आहेत.

धुळे जिल्ह्यात पहाटे एका कंटेनरमध्ये दहा हजार किलो चांदीच्या विटा सापडल्या. याची किंमत ९४ कोटी ६८ लाख रुपये इतकी आहे. हा माल एचडीएफसी बँकेचा असून पुढील तपास केला जात आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

**<><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी आज राज्यभरात शांततेत मतदान सुरू आहे. निवडणूक प्रक्रियेत कोणताही अडथळा येऊ नये यासाठी प्रशासन आणि पोलीस लक्ष ठेवून असून अनुचित प्रकार आढळून आल्यास कारवाई केली जात आहे.

नाशिक जिल्ह्यातल्या नांदगाव मतदारसंघातले शिवसेनेचे उमेदवार सुहास कांदे यांनी अपक्ष उमेदवार समीर भुजबळ यांना आज सकाळी जीवे मारण्याची धमकी दिली. सुहास कांदे यांनी मतदारांना एका बसमध्ये बसवून मतदान केंद्रावर आणल्याबद्दल भुजबळ यांनी आक्षेप घेतला होता. त्यामुळे हा वाद झाला. याप्रकरणी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचं जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी सांगितलं.

बीड जिल्ह्यातल्या परळी मतदारसंघातल्या घाटनांदूर मधल्या तीन मतदान केंद्रावर मतदान यंत्रांची तोडफोड करण्यात आली. त्यामुळे मतदान प्रक्रिया थांबवण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना मारहाण तसंच गाडीची तोडफोड केल्याचंही आमच्या वार्ताहराने  कळवलं आहे. बीड जिल्ह्यातल्या परळी मतदारसंघात मतदान यंत्राची तोडफोड केल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाने केला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातल्या चिमूर शहरात भाजप आणि काँग्रेसचे कार्यकर्ते समोरासमोर आल्यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता. मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

बारामतीतल्या एका मतदान केंद्रावर दमदाटी करून बोगस मतदान केलं जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बारामतीचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या आई शर्मिला पवार यांनी केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने हे आरोप फेटाळून लावले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही या मतदान केंद्रावर जाऊन या प्रकाराची पाहणी केली.

मतदान यंत्रावर आपल्या नावाच्या पुढे काळा डाग लावल्याची तक्रार अहिल्यानगर जिल्ह्यातल्या कर्जत जामखेड मतदारसंघातले राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे उमेदवार रोहित पवार यांनी केली आहे. संवेदनशील केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची मागणी पवार यांनी केली आहे.

ठाणे जिल्ह्यातल्या कोपरी पाचपाखाडी मतदारसंघातले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार केदार दिघे यांच्या विरोधात मद्य आणि पैसे वाटप केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातल्या कोल्हापूर उत्तर आणि दक्षिण मतदारसंघातल्या दोन केंद्रावर मतदान यंत्रात बिघाड झाल्यामुळे मतदान प्रक्रिया अर्धा तास विस्कळित झाली होती. त्यानंतर पर्यायी यंत्र बसवून प्रक्रिया सुरळित केली गेली. नागपूर उत्तर मतदारसंघातही काही वेळेसाठी मतदान यंत्रात बिघाड झाला होता.

बीड जिल्ह्यातल्या परळी मतदारसंघामधल्या धर्मापुरी इथल्या मतदान केंद्रातले सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचा प्रकार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी उघडकीला आणल्यानंतर. कॅमेरे सुरू करण्यात आले.

धाराशीव जिल्ह्यातल्या परंडा शहरातल्या मतदान केंद्रावरच्या मतदान केंद्रात बिघाड झाल्यामुळं मतदान काही काळ थांबवण्यात आलं होतं.

सोलापूर जिल्ह्यातल्या बार्शी विधानसभा मतदारसंघातल्या एका मतदान केंद्रावर एका मतदाराने चित्रफित तयार करून ती प्रसृत केली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून त्या मतदाराचा शोध सुरू असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली. हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी मतदारसंघातही असाच प्रकार आढळून आला. दोषी व्यक्तीला ताब्यात घेण्यात आलं असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या कन्नड तालुक्यातल्या रामनगर गावातल्या ग्रामस्थांनी पायाभूत सुविधांच्या अभावामुळे मतदानावर बहिष्कार टाकला आहे.

**<><><><>**

**AQ**आजपासून गोव्यात सुरुवात होत आहे. संध्याकाळी उद्घाटन सोहळ्यात भारतीय सिनेमाचा मूकपटापासून ते आत्तापर्यंतचा प्रवास दर्शवणारा कार्यक्रम सादर होईल. ८१ देशातले १८० चित्रपट हे महोत्सवाचं आकर्षण असून ऑस्ट्रेलियन चित्रपट निर्माते मायकेल ग्रेसी दिग्दर्शित 'बेटर मॅन' या चित्रपटानं महोत्सवाची सुरुवात होईल.

**//<><><><>//**